0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ यांचेकडून दिनांक २१/०५/२०११ रोजी प्राप्त झालेली कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३८/२०११/जा.४४१ दिनांक २७/५/२०११, ७/६/२०११, २३/६/२०११, ४/७/२०१, १६/७/२०११ व २८/७/२०११.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, समतानगर पोलिस स्टेशन यांचे दि.२१/०६/२०११ वं ३०/०६/२०११ रोजीचे अभिवेदन.

४) न्यु हिंदुस्थान गॅस सर्व्हिसचे व टेम्पो क्र. एमएच-०२-टी-१३८८ चे मालक हेमंतकुमार गोपालदास वर्मा यांचे दिनांक ३०/०६/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

५) संदीप रुद्रप्रताप सिंह व दिनेशकुमार मेवालाल यादव यांचे दिनांक ०९/०८/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE

क्र.निशि/अंमल/प्र.क्र.३८/२०११/जा. ६७३
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक :२७ /०८/२०११.

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २९/०४/२०११ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयास मिळालेल्या गुप्त बातमीनुसार त्यांचे पथकातील पोलीस अधिकारी/कर्मचारी, शिधावाटप यंत्रणेतील अधिकारी/कर्मचारी हे पंचासह सुमारे १०:१५ वाजण्याच्या सुमारास न्यु हिन्दुस्थान गॅस सर्व्हिस, पठाण चाळ, हनुमाननगर, कांदिवली (पूर्व), मुंबई याठिकाणी छापा टाकला असता, सदर ठिकाणी विश्वकर्मा फर्निचर आर्टच्या लगत व धनलक्ष्मी मेंटल ॲण्ड पेपर मार्टच्या बाजूस उत्तराभिमुख एक गाळा असून, त्यास निळ्या रंगाचा अर्धवट उघडलेला शटर आहे. पोलीस पथकाने पंचासह सदर गाळ्यामध्ये आत प्रवेश केला असता, आतमध्ये एकूण तीन इसम दिसून आले. त्यापैकी दोन इसम हे एका रबरी पाईपच्या सहाय्याने दुसऱ्या छोट्या लोखंडी विशिष्ट पाईपने सिलेंडरमध्ये गॅस भरत असून, तिसरा इसम

हा त्यांना मार्गदर्शन करीत असल्याचे दिसून आले. तीनही इसमास सदरची कृती करण्याचे थांबवून त्यांना त्यांचे नांव गाव विचारले असता, त्यानी त्याचे नाव हेमंतकुमार गोपाळदास वर्मा असे सांगून सदर गॅस दुकानाचा मालक असल्याचे सांगीतले. सदर साठा करुन ठेवलेल्या गॅस सिलेंडरबाबत अधिकृत कागदपत्रांची विचारणा केली असता, त्याचेकडे कोणतेही अधिकृत कागदपत्र अथवा परवाना नसल्याचेही त्याने सांगीतले. तसेच दुसरे दोन इसम यांना त्यांचे नांव गाव विचारले असता, एकाने त्याचे नाव संदीप रुद्रप्रताप सिंग व दुसऱ्याने त्याचे नांव दिनेश मेवालाल यादव असे सांगून ते हेमंतकुमार गोपाळदास वर्मा याचेकडे नोकरीत असल्याचे सांगीतले.

सदर गाळयाची पहाणी केली असता, प्रवेशद्धाराच्या आतील पश्चिमेकडील भिंतीला लागून भारत गॅस कंपनीचे एकूण १० भरलेले गॅस सिलेंडर असून, त्यापैकी तीन सिलेंडरचे कंपनीने लावलेले सिल तोडलेल्या स्थितीत आढळून आले. तसेच गाळ्याच्या आतील पूर्वेकडील भिंतीलगत गॅस पाईंट कंपनीचे १२ किलो वजनाचे लाल रंगाचे एकूण २८ सिलेंडर असून, त्यापैकी दोन सिलेंडरमध्ये प्रत्येकी चार किलो अर्धवट गॅस भरल्याचे आढळून आले. गाळ्याच्या दक्षिणेकडील नाल्या लगतच्या भिंतीच्या आतील बाजूस पहाणी केली असता, एकूण १७ किलो वजनाचे एच.पी.सी. कंपनीचा १ व गॅस पाईंट कंपनीचे ८ रिकामे कमर्शियल गॅस सिलेंडर मिळून आले.

सदर गाळ्याच्या लगत बाहेरील रस्त्यावर पूर्व भिमुख उभा करुन ठेवलेला थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-टी-१३८८ दिसून आला. सदर टेम्पोबाबत हेमंतकुमार वर्मा याचेकडे विचारणा केली असता, हा टेम्पो त्यांचाच असून तो अनधिकृत भरलेले गॅस सिलेंडर वितरीत करण्यासाठी वापरला जातो, असे सांगीतले. सदर टेम्पोची पहाणी केली असता, त्यामध्ये १४ किलो वजनाचे भरलेले व सिले असलेले चार सिलेंडर आढळून आले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबधितांनी संगनमत करुन शासनातर्फे अनुदानित दराने गॅस ग्राहकांना वितरीत होणारे तेल कंपनीचे घरगुती गॅस सिलेंडरचा बेकायदेशिर व अनधिकृतरित्या साठा करुन त्यामधील गॅस रिकाम्या खाजगी कंपनीच्या विविध क्षमतेच्या सिलेंडरमध्ये कमी प्रमाणात भरुन ग्राहकांची फसवणूक केली असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ (२) एल.पी.जी. ऑर्डर २००० चे कलम ३, ७ (II) तसेच (३) भा.द.वि. चे कलम २८५, ४२०, ३४ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द समतानगर पोलिस स्टेशन, कांदिवली, मुंबई येथे वि.स्था. गुन्हा नोंद क्र. १४५/११, दि.२९/०४/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | भारत पेट्रोलियम कंपनीचे १४ कि. वजनाचे गॅस सिलेंडर | १२ नग | ९,८००/- |
| २ | गॅस पाईंट कं.चे १२ कि. वजनाचे रिकामे गॅस सिलेंडर | २८ नग | १९,६००/- |

CONTROLLER OF RATIONING ... HEA ...

0003

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | हिन्दुस्थान पेट्रोलियम कं.चे १७ कि. वजनाचे एक रिकामा गॅस सिलेंडर तसेच गॅस पाईंट कं.चे १७ कि. वजनाचे ८ रिकामे गॅस सिलेंडर | ९ नग | ९,०००/- |
| ४ | थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-टी-१३८८ व त्यामधील भारत पेट्रोलियम कंपनीचे १४ कि. वजनाचे भरलेले चार गॅस सिलेंडर | १ नग<br>४ नग | ९७,०००/- |
| ५ | हिरव्या रंगाचा रबर पाईप व ६ इंच लोखंडी छोटा पाईप | २ नग | १००/- |
| | | एकूण | १,३५,५००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याकरिता, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि.०६/०६/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दि.०६/०६/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलीस अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक २१/०६/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २१/०६/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलीस अधिकारी तथा पोलीस उप निरीक्षक श्री दिलिप एस. गवानकर उपस्थित राहीले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तथापी, सदर सुनावणीस आरोपी/अपचारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक ३०/०६/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ३०/०६/२०११ रोजीच्या सुनावणीस न्यु हिंदूस्थान गॅस सर्व्हिस व टेम्पो क्र. एमएच-०२-टी-१३८८ चे मालक हेमंतकुमार गोपालदास वर्मा हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक ११/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ११/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची अंतीम संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक २६/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली. तथापी, दिनांक २६/०७/२०११ रोजीच्या सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली. सबब, पुढील सुनावणी दिनांक ०९/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE MUMBAI

दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस संदीप रुद्रप्रताप सिंह व दिनेशकुमार मेवालाल यादव हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ५ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले.

सबब, प्रकरण निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

दिनांक २१/०६/२०११ व ३०/०६/२०११ रोजीच्या सुनावणीचेवेळी सादर केलेल्या वरिष्ठ पोलिस निरिक्षक, समतानगर पोलिस ठाणे यांचे लेखी अभिवेदनात, यातील जप्त थ्री व्हीलर टेम्पो क्र.एमएच-०२-टी-१३८८ चे मालक म्हणून आरोपीत हेमंतकुमार गोपाळदास वर्मा हे हक्क सांगतात. पंरतू मालकी हक्काबाबत कोणतेही ठोस पुराव्याचे कागदपत्र सादर केलेले नाहीत. तसेच हेमंतकुमार वर्मा हा सदर भरलेले भारत गॅस कंपनीचे सिलेंडर कोठून प्राप्त केले याची माहिती देत नाही. जप्त केलेल्या गॅस सिलेंडरच्या मालकी बाबत आरोपीताने कोणतीही पुराव्याची कागदपत्रे सादर केली नाही. सदरची भरलेले जप्त गॅस सिलेंडर तात्पुरते मुक्ता गॅस एजन्सी, कुरार गांव यांचेकडे सुरक्षीततेसाठी ठेवले असून, ते ज्वलनशील असल्याने तसे ठेवणे धोकादायक आहे. त्याचप्रमाणे जप्त टेम्पो व रिकामे सिलेंडर पोलीस ठाणेत ठेवण्यात आले असून, सदर मुद्देमालाची नियमानुसार कारवाई अथवा विल्हेवाट लावण्यास समतानगर पोलीस ठाणेची काहीही हरकत नसल्याचे नमुद केले आहे.

दिनांक ३०/०६/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित न्यु हिंदूस्थान गॅस सर्व्हिस व टेम्पो क्र. एमएच-०२-टी-१३८८ चे मालक हेमंतकुमार गोपाळदास वर्मा यांनी सादर केलेल्या निवेदनात, तो न्यु हिंदूस्थान गॅस सर्व्हिसचा मालक असून, त्याने गॅस पॉईंट कंपनीकडून ३६ सिलेंडर खरेदी केले आहेत व भारत गॅसचे १६ सिलेंडर त्याने जेव्हा दामू नगर, गौतम नगर या झोपडपट्ट्या फारेस्ट वाले तोडत होते. त्यावेळेस जे लोक गाव सोडून जात होते. त्या लोकांनी सदर सिलेंडर त्याला विकले. क्राईम ब्रांचवाल्यांनी त्याचे दुकानाचे ताळे जबरदस्तीने कापून दुकानामधून सिलेंडर जप्त केले व रस्त्यावरुन चालणाऱ्या संदीप रुद्रप्रताप सिंह व दिनेश मेवालाल यादव यांना त्याचे नोकर सांगितले. परंतू त्याचा त्यांचेशी काही संबंध नाहीत. तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०२-टी-१३८८ त्याने अनिल चौहान या इसमाकडून रुपये २०,०००/- ने खरेदी केला आहे. या टेम्पोचे आरसी बुक त्याच्या नावावर नोंदणी झालेले नाहीत. सदर टेम्पो त्याचे कुंटुबाच्या उदरनिर्वाहचे साधन असून जप्त केलेला टेम्पो व सिलेंडर त्याला परत मिळावा असे नमूद केले आहे.

दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित संदीप रुद्रप्रताप सिंह व दिनेशकुमार मेवालाल यादव यानी युक्तीवाद केला की, या गुन्ह्याशी त्यांचे काहीही देणे घेणे नाही. ते दुकानाच्या जवळ बसून संभाषण करीत होते. त्यानंतर क्राईम ब्रॉचवाल्यांनी येऊन दुकानाचे कुलूप तोडले. परंतू दुकानात त्यांना कोणी भेटले नाही कारण

दुकान बंद होते. त्यानंतर क्राईम ब्रॅंचवाल्यांनी त्याच्यांशी विचारणा केली की याचा मालक कोण आहे? तेव्हा त्या दोघांनी माहिती नाही असे सांगितल्याने त्या दोघांना त्यात फसवण्यात आले, असे सांगून तसे स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी दिनांक २९/०४/२०११ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयास मिळालेल्या गुप्त बातमीनुसार त्यांचे पथकातील पोलीस अधिकारी/कर्मचारी तसेच शिधावाटप यंत्रणेतील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचासह न्यु हिन्दुस्थान गॅस सर्व्हिस, पठाण चाळ, हनुमाननगर, कांदिवली (पूर्व), मुंबई याठिकाणी छापा टाकून गाळ्यामध्ये आत प्रवेश केला असता, त्याठिकाणी एकूण तीन इसम दिसून आले. त्यापैकी दोन इसम हे एका रबरी पाईपच्या सहाय्याने दुसऱ्या छोट्या लोखंडी विशिष्ट पाईपने सिलेंडरमध्ये गॅस भरत असून, तिसरा इसम हा त्यांना मार्गदर्शन करीत असल्याचे दिसून आले. तीनही इसमास सदरची कृती करण्याचे थांबवून, त्यापैकी हेमंतकुमार गोपाळदास वर्मा या इसमाकडे सदर साठा करुन ठेवलेल्या गॅस सिलेंडरबाबत अधिकृत कागदपत्रांची विचारणा केली असता, तो सदर गॅस दुकानाचा मालक असल्याचे सांगून त्याचेकडे कोणतेही अधिकृत कागदपत्र अथवा परवाना नसल्याचेही त्याने सांगीतले. तसेच दुसरे दोन इसम संदीप रुद्रप्रताप सिंग व दिनेश मेवालाल यादव यांचेकडे विचारणा केली असता, ते हेमंतकुमार वर्मा याचेकडे नोकरीस असल्याचे त्यांनी सांगीतले.

तद्नंतर सदर गाळयाची पहाणी केली असता, त्याठिकाणी भिंतीला लागून भारत गॅस कंपनीचे एकूण १० भरलेले गॅस सिलेंडर असून, त्यापैकी तीन सिलेंडरचे कंपनीने लावलेले सिल तोडलेल्या स्थितीत आढळून आले. तसेच गॅस पाईंट कंपनीचे १२ किलो वजनाचे लाल रंगाचे एकूण २८ सिलेंडर असून, त्यापैकी दोन सिलेंडरमध्ये [illegible]पैकी चार किलो अर्धवट गॅस भरल्याचे आढळून आले. त्याचप्रमाणे आतील बाजूस पहाणी केली असता, एकूण [illegible] किलो वजनाचे एच.पी.सी. कंपनीचा १ व गॅस पाईंट कंपनीचे ८ रिकामे कमर्शियल गॅस सिलेंडर मिळून आले.

सदर गाळ्याच्या लगत बाहेरील रस्त्यावर थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-टी-१३८८ हा उभा असल्याचे दिसून आले. सदर टेम्पोबाबत हेमंतकुमार वर्मा याचेकडे विचारणा केली असता, हा टेम्पो त्यांचाच असून तो अनधिकृत भरलेले गॅस सिलेंडर वितरीत करण्यासाठी वापरला जातो, असे सांगीतले. तद्नंतर सदर टेम्पोची पहाणी केली असता, त्यामध्ये १४ किलो वजनाचे भरलेले व सिल असलेले चार सिलेंडर आढळून आले. यावरुन सदर टेम्पो व भारत पेट्रोलियम कंपनीचे १४ कि. वजनाचे भरलेले चार गॅस सिलेंडर, भारत पेट्रोलियम कंपनीचे १४ कि.

वजनाचे १२ गॅस सिलेंडर, गॅस पाईट कं.चे १२ कि. वजनाचे रिकामे २८ गॅस सिलेंडर व २ पाईप असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सुनावणीचेवेळी पोलीसांनी सादर केलेल्या खुलाशात, यातील आरोपीत हेमंतकुमार वर्मा हा सदर भरलेले भारत गॅस कंपनीचे सिलेंडर कोठून प्राप्त केले याची माहिती देत नसून, जप्त केलेल्या गॅस सिलेंडरच्या मालकी बाबत कोणतीही पुराव्याची कागदपत्रे सादर केली नाहीत. सदरची भरलेले जप्त गॅस सिलेंडर तात्पुरते मुक्ता गॅस एजन्सी, कुरार गांव यांचेकडे सुरक्षीततेसाठी ठेवले असून, ते ज्वलनशील असल्याने तसे ठेवणे धोकादायक आहे. तरी सदर मुद्देमालाची नियमानुसार कारवाई अथवा विल्हेवाट लावण्यास त्यांची काहीही हरकत नसल्याचे नमुद केले आहे. तसेच न्यु हिंदूस्थान गॅस सर्व्हिस व टेम्पो क्र. एमएच-०२-टी-१३८८ चे मालक हेमंतकुमार गोपळदास वर्मा यांनी सादर केलेल्या खुलाशात, त्याने गॅस पॉईंट कंपनीकडून ३६ सिलेंडर खरेदी केले आहेत व भारत गॅसचे १६ सिलेंडर त्याने जेव्हा दामू नगर, गौतम नगर या झोपडपट्ट्या फारेस्ट वाले तोडत होते. त्यावेळेस जे लोक गाव सोडून जात होते. त्या लोकांनी सदर सिलेंडर त्याला विकले. क्राईम ब्रांचवाल्यांनी त्याचे दुकानाचे ताळे जबरदस्तीने कापून दुकानामधून सिलेंडर जप्त केले व रस्त्यावरुन चालणाऱ्या संदीप रुद्रप्रताप सिंह व दिनेश मेवालाल यादव यांना त्याचे नोकर सांगितले. परंतू त्याचे त्यांचेशी काही संबंध नसल्याचे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे संदीप रुद्रप्रताप सिंह व दिनेश मेवालाल यादव यांनी, या गुन्ह्याशी त्यांचे काहीही देणे घेणे नाही. ते दुकानाच्या जवळ बसून संभाषण करीत होते. त्यानंतर क्राईम ब्रॉंचवाल्यांनी येऊन दुकानाचे कुलूप तोडले. परंतू दुकानात त्यांना कोणी भेटले नाही कारण दुकान बंद होते. त्यानंतर क्राईम ब्रॉंचवाल्यांनी त्याच्यांशी विचारणा केली की याचा मालक कोण आहे? तेव्हा त्या दोघांनी माहिती नाही असे सांगितल्याने त्या दोघांना त्यात फसवण्यात आले असल्याचा खुलासा सुनावणीच्यावेळी केला आहे.

तथापी, घटनेच्या ठिकाणी पोलिसांनी पंचासह टाकलेल्या धाडीच्या वेळी सदर गाळ्याचे निळ्या रंगाचे शटर अर्धवट उघडलेले असून, सदर गाळ्यामध्ये दोन इसम हे एका रबरी पाईपच्या सहाय्याने दुसऱ्या छोट्या लोखंडी विशिष्ट पाईपने सिलेंडरमध्ये गॅस भरत असून, तिसरा इसम हा त्यांना मार्गदर्शन करीत असल्याचे दिसून आले. मार्गदर्शन करीत असलेल्या इसमास विचारणा केली असता, त्याने त्याचे नाव हेमंतकुमार गोपळदास वर्मा असे सांगून सदर गॅस सिलेंडरबाबत त्याचेकडे कोणतेही अधिकृत कागदपत्र अथवा परवाना नसल्याचेही त्याने सांगीतले. तसेच दुसरे दोन इसम संदीप रुद्रप्रताप सिंग व दिनेश मेवालाल यादव यांचेकडे विचारणा केली असता ते हेमंतकुमार वर्मा याचेकडे नोकरीस असल्याचे त्यांनी सांगीतले. त्याचप्रमाणे घटनास्थळी १४ किलो क्षमतेचे भारत गॅस कंपनीचे भरलेले १० सिलेंडर आढळले असून, त्यापैकी तीन सिलेंडरचे कंपनीने लावलेले सिल तोडलेल्या स्थितीत आढळून आले. एकूण १७ किलो वजनाचे एच.पी.सी. कंपनीचा १ व गॅस पाईंट कंपनीचे ८ रिकामे



CONTROLLER OF RATIONING HEA

व्यवसायीक गॅस सिलेंडर आढळून आले असल्याचे पंचनाम्यावरुन दिसून येते. तसेच खुलाशात नमुद केल्याप्रमाणे गॅस पाईंट कंपनीकडून ३६ सिलेंडर खरेदी केल्याबाबत कोणताही पुरावा सुनावणीचेवेळी सादर केलेला नाही. तसेच दामू नगर, गौतम नगर विभागातील झोपडपट्ट्या वनविभागाने तोडले त्यावेळेस त्यांचेकडील भारत गॅसचे १६ सिलेंडर त्याने विकत घेतले असल्याचे खुलाशात नमुद केले असले तरी त्याने सदरचे शासन नियंत्रित गॅस सिलेंडर स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी गैरव्यवहार करण्याच्या उद्देशाने अनधिकृतपणे खरेदी केले असल्याचे दिसून येते. आरोपी याने सुनावणीच्यावेळी केलेला खुलासा व घटनास्थळी दिलेला जबाब एकमेकाशी विपर्यास्त आहे. यावरुन आरोपी यांनी सुनावणीचे वेळी दिलेले खुलासे मोघम स्वरुपाचे असून, आरोपी यांनी शासन नियंत्रित तेल कंपनीचे गॅस सिलेंडर गैरमार्गाने मिळवून त्यामधील गॅस बेकायदेशीररित्या रबरी पाईपच्या सहाय्याने खाजगी कंपनीच्या विविध क्षमतेच्या रिकाम्या सिलेंडरमध्ये भरुन त्याची ग्राहकांना विक्री करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. तसेच सद्य:स्थितीत सकृतदर्शनी दिसून येत असलेल्या वस्तुस्थितीवरुन प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेले गॅस पाईंट या खाजगी कंपनीचे गॅस सिलेंडर अवैध ठरते. सबब, प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेले भारत पेट्रोलीयम, हिन्दुस्थान पेट्रोलियम व गॅस पाईंट कंपनीचे संपुर्ण गॅस सिलेंडरचा साठा शासन जमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी हेमंतकुमार गोपाळदास वर्मा यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-०२-टी-१३८८ हा अनिल चौबे या इसमाकडून त्याने खरेदी केला असल्याचे नमुद करुन तसा करारनामा सादर केला आहे. तथापी, हेमंतकुमार गोपाळदास वर्मा यांचे नावे सदर टेम्पो नोंदणी झाला नसल्याचे त्यांनी सादर केलेल्या वाहन नोंदणी प्रमाणपत्रावरुन दिसून येते. तसेच सदर टेम्पोचा वापर जप्त केलेल्या गॅस सिलेंडरच्या वाहतुकीकरीता करीत असल्याबाबत हेमंतकुमार गोपाळदास वर्मा यांनी घटनास्थळी सांगीतले असल्याचे पंचनाम्यावरुन दिसून येते. त्याचप्रमाणे सदर टेम्पोमध्ये भारत पेट्रोलियम कंपनीचे १४ किलो वजनाचे भरलेले चार सिलेंडर आढळून आले आहे. यावरुन आरोपी हेमंतकुमार गोपाळदास वर्मा याने विनापरवाना व जाणीवपुर्वक शासन नियंत्रित गॅस सिलेंडर तसेच बेकायदेशीररित्या भरलेल्या गॅस सिलेंडर्सची वाहतुक करण्यासाठी सदर टेम्पोचा गैरवापर केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. तथापी सदर टेम्पोवरच त्याच्या कुंटुबाचे उदरनिर्वाह अवलंबून आहे, ही बाब विचारात घेता, शासनाचे परिपत्रक क्रमांक जीवका-१००५/प्र.क्र.४३८/ ना.पु.२३, दिनांक ३० ऑगष्ट, २००५ मधील निर्देशानुसार सदरचा जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-०२-टी-१३८८ हा त्याच्या एकूण किंमतीच्या ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर टेम्पो मालकास परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तथापि, सदरची कार्यवाही करण्यापूर्वी पोलीसांनी या वाहनाच्या मालकीबाबत खातरजमा करावी.

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
OFFICE
BAI

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये समतानगर पोलिस स्टेशन, कांदिवली, मुंबई येथे वि.स्था. गुन्हा नोंद क्र. १४५/११, दि.२९/०४/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) जप्त करण्यात आलेला थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-टी-१३८८ हा त्याच्या एकुण किमतीच्या ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर त्याच्या मालकास परत करण्यात यावा.

तथापि, सदरची कार्यवाही करण्यापूर्वी पोलीसांनी या वाहनाच्या मालकीबाबत खातरजमा करावी.

२) सदरची बँक हमी या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत वेळोवेळी विहीत वेळेत नुतणीकरण करुन पोलिसांकडे देण्याची जबाबदारी टेम्पो मालकाची राहील.

३) या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत सदरहू टेम्पो वाहन विक्री करता येणार नाही व कोणासही हस्तांतरण करता येणार नाही.

४) तथापी, या वाहनांच्या मालकाने अशी बँक हमी सादर न केल्यास सदर वाहनांची पोलिसांनी नियमानुसार जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

५) जप्त करण्यात आलेले भारत पेट्रोलियम कंपनीचे १४ कि. वजनाचे भरलेले १६ गॅस सिलेंडर व हिन्दुस्थान पेट्रोलियम कंपनीचे १७ कि. वजनाचा एक रिकामा गॅस सिलेंडर यांचा साठा शासनजमा करण्यात यावा.

६) सदर शासन जमा करण्यात आलेले संपुर्ण गॅस सिलेंडर्सचा साठा राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०, पी डि मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई यांना देवून, त्यापोटी त्यांचेकडून प्राप्त होणारी रक्कम शासनजमा करावी.

७) तसेच जप्त करण्यात आलेले गॅस पाईंट कंपनीचे १२ कि. वजनाचे रिकामे २८ गॅस सिलेंडर तसेच गॅस पाईंट कंपनीचे १७ कि. वजनाचे ८ रिकामे गॅस सिलेंडर यांचा साठा आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे जमा करावे.

CONTROLLER OF RATIONING

0009

८) जप्त करण्यात आलेले हिरव्या रंगाचा रबर पाईप व ६ इंच लोखंडी छोटा पाईप इ. वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) हेमंतकुमार गोपाळदास वर्मा, न्यु हिन्दुस्थान गॅस सर्व्हिसचे मालक
२) संदीप रुद्रप्रताप सिंग
३) दिनेश मेवालाल यादव
४) थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-टी-१३८८ चे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, समतानगर पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, समतानगर पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ग-परिमंडळ यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०-पी, डी-मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई १० यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

0010